REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १६ आगस्ट, १९५० | अंक ३३




## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत ( लाकडें कापण्याकरितां ) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड**
भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे. )



आमचें ब्रीदवाक्य—' सुरक्षितता, सेवा व संरक्षण '
ठेवीदारांची स्वतःची बँक

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड

( हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १ )

चेअरमन : **सर एच्. पी. दस्तुर**; बी. ए. एलएल. बी., बार ॲट लॉ; रिटायर्ड चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, मुंबई

**सतत प्रगतिपथावर असलेली बँक**

**सवलती व वैशिष्ट्यें.**

१ करंट आकाउंटवर द. सा. द. शें. ॥ टक्का व्याज दिलें जातें.
२ सेव्हिंग बँक खात्यास „ १½ टक्का व्याज असून आठवड्यातून दोन वेळां चेकनें पैसे काढतां येतात.
३ अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याजाचे दर.
४ चेक, हुंड्या, बिल, रशिदी इत्यादींच्या वसुलीसाठीं व्यापारी-वर्गास तात्काल व उपयुक्त मदत.
५ डिमांड ड्राफ्ट व मेल ट्रान्सफरच्या पैसे धाडण्याच्या सवलती.
६ सोनें, समंत शेअर, माल, सरकारी बिलें इत्यादि तारणांवर कर्जें दिलीं जातात.
७ लेटर्स ऑफ क्रेडिट वगैरे सर्व तऱ्हेच्या आधुनिक बँकिंग सवलती कमी खर्चांत उपलब्ध करून दिल्या जातात.

**४८ शाखांचा अखिल भारतीय विस्तार**

मुंबईत स्थानिक ७. दिल्लीस २. पूर्व पंजाबांत १. मध्यप्रांत व वऱ्हाडांत ९. महाराष्ट्रांत व इतरत्र २९. एकूण ४८ शाखा.

**मुंबईः**—१ दादर २ गिरगांव ३ सँडरोड ४ जव्हेरी बाजार ५ माटुंगा ६ सायन ७ विलेंपार्ले.

**मध्यप्रांत व वऱ्हाडः**—१ अकोला २ अमरावती ३ चांदा ४ इतवारी, नागपूर ५ सिताबर्डी, नागपूर ६ धर्मपेठ, नागपूर ७ मूर्तिजापूर ८ कारंजा ९ यवतमाळ.

**महाराष्ट्रांत व इतरत्रः**—१ अहमदाबाद २ अहमदनगर ३ बेळगांव ४ देवळाली ५ धुळें ६ इचलकरंजी ७ जळगांव ८ कोल्हापूर ९ कोल्हापूर शाहुपुरी १० कोपरगांव ११ लोणंद १२ महाड १३ मालेगांव १४ मिरज १५ मिरज हॉस्पिटल १६ नंदुरबार १७ नाशिक शहर १८ नाशिक रोड १९ पंढरपूर २० पेण २१ पुणें २२ शिवाजी नगर २३ पिंपळगांव ( बसवंत ) २४ संगमनेर २५ सांगली २६ सोलापूर २७ सिन्नर २८ नागपूर २९ शहापूर बेळगांव.

**दिल्लीः**—१ चांदणी चौक २ पहारगंज नवी दिल्ली.
**पूर्व पंजाबः**—१ गुरगांव

अधिक माहितीसाठीं लिहा : **व. दा. देशपांडे**
मॅनेजिंग डायरेक्टर.

दळणाच्या चक्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**पाकिस्तानांत कागदाची गिरणी**—चित्तगांवजवळच्या डोंगर भागांत कागदाची एक गिरणी काढण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. ह्या गिरणींत दरवर्षी ३०,००० टन कागद तयार होईल असा अंदाज आहे. गिरणीला एकूण खर्च ४ कोटी रु. येणार असून त्यांतील ३॥ कोटी कायम भांडवलाच्या स्वरूपानें आहेत. पाकिस्तानच्या औद्योगिक विकाससंबंधीच्या कायद्यान्वयें पुरस्कृत करण्यांत आलेला हा दुसरा कारखाना आहे.

**मद्रास सरकारला मिळालेलें जादा कर्ज**—मद्रास सरकारनें रिझर्व्ह बँकेमार्फत नुकतेंच ४ कोटी रुपयांचें कर्ज उभारलें. त्यावेळीं ४७ लाख रुपयांचे अधिक अर्ज आले होते. ४ कोटीं-पेक्षां अधिक आलेल्या ह्या कर्जाचा उपयोग मद्रास सरकारला करूं देण्याची खास सवलत रिझर्व्ह बँकेनें दिली आहे. जादा भरती झालेल्या कर्जाचा उपयोग पाटबंधारे आणि वीज उत्पन्न करण्याच्या योजनांकडे करण्यांत येणार आहे.

**सायकलींचा ग्रामोद्योग?**—पंजाबमध्यें ग्रामोद्योग पद्धतीनें सायकली तयार करण्यासाठीं एक संघटना उभारण्यांत यावी अशी शिफारस टॅरीफ बोर्डानें केली होती; परंतु ती भारतीय सरकारनें नामंजूर केली असें समजतें. सायकलींना लागणारा निरनिराळा माल वेगळवेगळ्या ठिकाणीं तयार करून नंतर त्यांची जुळणी करून संपूर्ण सायकल बनविण्याची सूचना टॅरीफ बोर्डानें केली होती अशी वार्ता आहे. ह्या योजनेसाठीं कांहीं हजार रुपयेच खर्च आला असता असा अंदाज करण्यांत आला होता.

**नवीन तऱ्हेच्या ग्रामोफोन रेकॉर्ड्स्**—ग्रामोफोन तयार करणाऱ्या एका ब्रिटिश कंपनीनें नवीन तऱ्हेच्या तबकड्या तयार केल्या आहेत. ह्या तबकड्यासाठीं वापरण्यांत येणारी लाख नवीन प्रकारची असल्यामुळें ग्रामोफोनच्या सुईचा तबकडीवरील आवाज जवळ जवळ होतच नाहीं. एक रेकॉर्ड एका सुईनें १०० वेळा वाजविली तरी ती बिघडत नाहीं. रेकॉर्ड हातांतून पडल्यास ती सहसा फुटतही नाहीं.

**तयार अन्नाच्या आयातीस विरोध**—संयुक्त-राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती शाखेतर्फे अमेरिकेनें आपल्या जवळील कांहीं शिलकी तयार अन्न न्यूझीलंडला देऊं केलें होतें. न्यूझीलंड सरकाराचे फडणीस मि. अॅशविन ह्यांनीं ह्या आयातीला विरोध केला आहे. ह्या मालाच्या मूळच्या किंमतीपेक्षां तो फारच स्वस्त देण्यांत येत असल्यानें बाजारांतील किंमती बिघडतील असें त्यांचें म्हणणें आहे. अमेरिकेनें देऊं केलेल्या मालांत मुख्यतः दुधाचे डबे होते. मि. अॅशविन हे न्यूझीलंडच्या डेअरा प्राडक्टस मार्केटिंग असोसिएशनचे सरकारी सभासद आहेत.

**बँक ऑफ फ्रान्स जवळील सोनें**—बँक ऑफ फ्रान्सजवळ असलेल्या सोन्याच्या सांठ्याची किंमत डॉलरच्या परिमाणांत वाढविण्यांत यावी असा ठराव फ्रेंच अॅसेम्ब्लीनें मंजूर केला आहे. एका डॉलरला ३४९·६ फ्रँक ह्या सध्यां चालू असलेल्या दरानें सोन्याची किंमत करण्यांत यावी, असा ठरावाचा हेतू आहे. अमेरिकेंत कर्ज उभारण्यास सोपें जावें म्हणून ही खटपट करण्यांत आली आहे.

**मुंबई राज्यांतील वनसप्ताह**—भारतीय सरकारच्या आदेशाप्रमाणें मुंबई राज्यांत वनसप्ताहाच्या प्रसंगीं २५ लाख झाडें लावावयाचीं होतीं. मुंबई राज्यानें ह्या आंकड्याच्या पुढें जाऊन २६,८७,३६७ झाडें लावलीं आहेत. झाडें लावण्याचा कार्यक्रम पावसाळा संपेपर्यंत चालू रहाणार असून लावलेल्या झाडांची निगा राखण्याचे सर्व प्रयत्न सरकार करणार आहे.

**पूर्व पाकिस्तानांत तेल सांपडलें**—पूर्व-बंगाल व आसामच्या सरहद्दीवरील पथारिआच्या राखीव जंगलांत पाकिस्तानच्या हद्दींत भूमिगत तेल सांपडल्याचें निश्चितपणें समजतें. बी. ओ. सी. ही ब्रिटिश कंपनी गेलीं तीन वर्षें तेलासाठीं तेथें शोध करीत होती. येत्या दोन वर्षांत ह्या तेलाच्या खाणींतून ५,००,००० टन तेल उपसतां येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**मध्य प्रदेशांतील सहकारी चळवळ**—मध्य प्रदेशांत ४०, ६० व ८० नंबरच्या सुताचा तुटवडा पडला असल्यानें ह्या धाग्यांच्या किंमती फार वाढल्या आहेत. नागपूर प्रॉ. वीव्हर्स को–ऑपरेटिव्ह लि. ह्या संस्थेनें विणकरांच्या प्राथमिक संस्थांना आणि व्यापाऱ्यांना वरील नंबरांचें सूत पुरविलें. सागर येथें कोळ्यांची आणखी एक सहकारी संस्था स्थापन झाली आहे. आतां प्रांतांत कोळ्यांच्या ८ सहकारी संस्था झाल्या आहेत.

**नागपूरजवळ सोन्याची खाण**—नागपूरजवळील बिजारी ह्या खेड्यांत सोन्याची खाण सांपडल्याचें समजतें. एक गुराखी विहीर खणत असतां त्याला सोनें-मिश्रित माती सांपडली. ती सोनाराला दाखविली. मातींत सोनें असल्याचा त्याचा अभिप्राय पडला. खाणीच्या जागेवर आतां पोलिसांचा पहारा ठेवण्यांत आला आहे.

**२७८ कारखाने बंद**—पूर्व बंगालमधील २७८ कारखाने बंद पडले आहेत. ह्या कारखान्यांत कापडाच्या गिरण्या, साखरेचे व आगपेट्यांचे कारखाने आहेत. बहुतेक सर्व कारखाने हिंदूंच्या मालकीचे आहेत. कारखाने १ महिन्यांत चालू करण्यांत न आल्यास पूर्व बंगाल सरकार ते आपल्या ताब्यांत घेणार असल्याचें समजतें.

पुणें येथील ऑफिसचें उद्घाटन

जाहीर निमंत्रण

आमच्या चालू व्यवसायाच्या (मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील स्टॉक एक्सचेंजमधील शेअर्स, सिक्युरिटीज, इत्यादींची खरेदी-विक्री) पुणें येथील ऑफिसचा औपचारिक उद्घाटन समारंभ आमचे पहिले व माननीय ग्राहक श्री. नारायणराव करंदीकर, चालक, सिव्हिक आणि कं. पुणें ४, ह्यांच्या हस्तें सोमवार, दि २१ ऑगस्ट रोजीं सकाळीं ११–३० वाजतां होणार आहे. तरी आमच्या सर्व ग्राहकांनीं व हितचिंतकांनीं त्या वेळीं अगत्य येण्याचें करावें, अशी विनंति आहे.

कचेरी:—'उल्हास'
जंगली महाराज रोड, पुणें ४.
वेळ:—११–३० ते २–३०.
अच्युत शंकर साठे

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

अर्थ

बुधवार, ता. १६ आगस्ट, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## रिझर्व्ह बँक कृत बँकिंगचा आढावा *

१९४८ च्या मध्यास बँकांजवळील ठेवी कमी होण्यास प्रारंभ झाला. त्यामुळें कित्येक बँकांना आपली स्थिती नीट राखणें अवघड झालें. त्यांनीं आपला व्याप भरमसाट वाढविला होता आणि व्यापारी बँकिंगचीं तत्त्वें गुंडाळून ठेवून व्यवहार चालविला होता. त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. पांच शेडयूल्ड बँका व कित्येक बिगर-शेडयूल्ड बँका सप्टेंबर-आक्टोबर १९४८ मध्यें बंद पडल्या. येणें कर्जें कायम राहून रोकड रकमांचें प्रमाणहि पूर्ववत ठेवण्यांत आलें, त्यामुळें रोख्यांतील गुंतवणूक मात्र कमी झाली, असें सर्व बहुतेक सर्व बँकांच्या बाबतींत घडलें.

१९४७ अखेर ९९ शेडयूल्ड बँका होत्या. १९४८ मध्यें तीन बँका शेडयूलमध्यें नव्यानें दाखल झाल्या आणि दोन बँका शेडयूलमधून गळून शेडयूल्ड बँकांची एकूण संख्या १९४८ अखेर १०० झाली. शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या ६३ नें वाढून ती ३०२४ झाली. परंतु बिगर शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्या ६४ नें कमी होऊन १७६७ वर आल्या. बिगर शेडयूल्ड बँकांपैकीं अगदीं लहान बँकांच्या कचेऱ्यांतच विशेष घट झाली. सहकारी बँकांची संख्या १९४७ मध्यें ५४३ होती, ती १९४८ मध्यें ५८३ झाली. हिंदी बँकांनीं परदेशांतील शाखा ( विशेषत: पाकिस्तानांतील ) कमी करण्याचें धोरण कायम ठेवलें. हिंदी शेडयूल्ड बँकांच्या भारताबाहेर १९४६ मध्यें ६२८ शाखा होत्या, त्या १९४७ मध्यें ४६३ झाल्या व १९४८ मध्यें २१६ झाल्या. बिगर शेडयूल्ड बँकांच्या शाखाही १८३ च्या ६८ व नंतर ५८ झाल्या. नव्या शाखा उघडण्यासाठीं किंवा चालू शाखांचें स्थलांतर करण्यासाठीं किंवा विशिष्ट कामापुरत्या तात्पुरत्या शाखा काढण्यासाठीं १९४८ मध्यें रिझर्व्ह बँकेकडे एकूण २३७ अर्ज आले. १३१ नव्या शाखांस व १३ तात्पुरत्या शाखांस परवानगी देण्यांत आली, आणि १२९ चालू शाखांचें स्थलांतर मंजूर करण्यांत आलें.

बँकांच्या कचेऱ्यांपैकीं २,३३५ म्हणजे ४४% कचेऱ्या ५० हजारावरील लोकवस्तीच्या १३४ शहरांतून होत्या. त्या शहरांतील प्रत्येक ८,४७३ लोकवस्तीच्या वांट्यास एक बँक कचेरी आली. २,८४२ म्हणजे ५६% बँक कचेऱ्या ५० हजाराखालील वस्तीच्या १४०० गांवीं होत्या. म्हणजे त्यांतील प्रत्येक ६,१४३ लोकवस्तीच्या वांट्यास एक बँक कचेरी आली. भारतांतील सर्व लोकसंख्या व बँक कचेऱ्या विचारांत घेतल्या तर ६५,८८४ लोकवस्तीस एक बँक कचेरी असें प्रमाण पडतें. शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांपैकीं ५३% कचेऱ्या मोठ्या शहरांतून आहेत, तर बिगर शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यापैकीं ६७% कचेऱ्या लहान गांवांतून आहेत. सहकारी बँकांच्या कचेऱ्यांपैकीं ६३ % कचेऱ्या लहान गांवांतून आहेत.

१९४८ सालीं ३८ चालू बँकांनीं आणखी भांडवल विक्रीस काढण्यासाठीं अर्ज केला आणि नव्या बँका काढण्यासाठीं १७ अर्ज करण्यांत आले. पहिल्यांपैकीं १३ व दुसऱ्यांपैकीं १ अर्ज रिझर्व्ह बँकेनें मंजूर केला.

पाकिस्तानांतील नुकसानीची तरतूद करण्यासाठीं कांहीं बँकांनीं १९४८ मध्यें मोठाले रिझर्व्ह निर्माण केले. त्यामुळें रिझर्व्ह फंडांत मोठी वाढ झाली. शेडयूल्ड बँकांचे रिझर्व्ह १९४८ सालीं १६.६४% नें वाढलें. १९४७ सालीं फक्त ६.९८% वाढ झाली होती. बिगर शेडयूल्ड बँकांचे रिझर्व्ह १९४८ मध्यें १५.५९% नें वाढलें. टक्केवारीनें ही वाढ मोठी दिसते, परंतु प्रत्यक्ष आंकड्यांत शेडयूल्ड बँकांचे रिझर्व्ह ३.६७% कोटींनीं वाढले तर बिगर शेडयूल्ड बँकांचें फक्त ४६ लाखांनीं वाढलें.

* स्टॅटिस्टिकल टेबल्स रिलेटिंग टु बँक्स इन इंडिया फॉर दि इअर १९४८. किं. ६ रु. पृ. सं. १५७.

## अमेरिकन कारखानदार कामगारांच्या आरोग्यासाठी काय करतात ?

अमेरिकेंत कामावर असणाऱ्या ६ कोटी लोकांपैकीं दर आठवड्यास किमान १० लक्ष लोक आजारीपणामुळें कामावर गैरहजर असतात. पुरुषांपेक्षां स्त्रियांचे दिवस आजारीपणामुळें जास्त बुडतात. एकूण ६ कोटी कामगारांपैकीं ३० ते ४०% कामगारांना कोठल्यातरी प्रकारची वैद्यकीय मदत उपलब्ध असते. कांहीं ठिकाणीं वैद्यकीय उपचाराचा सर्व खर्च मालक सोसतात, तर कांहीं ठिकाणीं यूनियन्स सोसतात. परंतु, बहुधा तो दोघांनीं वांटून घेतला जातो. तात्कालिक मदत देण्यापासून पुरें बरें करण्यापर्यंत या वैद्यकीय मदतीचें वेगवेगळें स्वरूप असतें. अमेरिकेंतील रेल्वे कंपन्यांचीं ३६ इस्पितळें आहेत, त्यांत ४,००० रुग्णांची सोय आहे आणि तेथें ९६,५०० रुग्णांना उपचार केला जातो. १६,००० डॉक्टर्सची मदत घेतली जाते. कामगार त्यासाठीं दरमहा दीड ते पांच डॉलर देतात. त्यांतून निम्मा खर्च भागतो. बाकीचा खर्च रेल्वेज सोसतात.

आपल्या कामगारांच्या आरोग्याचें रक्षण करणें किफायतशीर असतें, ह्याची बड्या कारखानदारांना पूर्ण जाणीव असते. १९४८ सालीं दि इंटर नॅशनल हार्वेस्टर कंपनीनें आपल्या ९० हजार कामगारांवर प्रत्येकीं १८.७२ डॉलर्स खर्च केले. कंपनीस एकूण खर्च १६,८४,५५६ डॉलर्स आला. परंतु त्यामुळें कंपनीचा अखेर फायदाच झाला. जनरल मोटर्स कंपनीच्या नोकरींत ११५ डॉक्टर व ६०० नर्सेस आहेत आणि त्यांचे द्वारा १०० कारखान्यांतील ३,००,००० लोकांचें आरोग्य राखलें जातें. युनायटेड स्टील कॉर्पोरेशन, अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनी, वेस्टिंग हाउस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशन, इत्यादि कंपन्यांनींहि अशीच व्यवस्था केली आहे. कामगारांच्या मानसिक आरोग्याची तरतूद मेट्रोपोलिटन विमा कंपनी, ईस्टमन कोडॅक कंपनी, इत्यादींनीं केली आहे. युनायटेड फ्रूट कंपनीचें न्यूयॉर्कमध्यें इस्पितळ आहेच, परंतु त्याबरोबर तिनें क्युबांत व मध्य अमेरिकेंत १३ इस्पितळें चालविलीं आहेत. ह्या कंपनीच्या

कोणत्याहि कामगारानें डॉक्टर, इस्पितळ, औषधपाणी, शस्त्रक्रिया, इत्यादींच्या खर्चाबद्दल काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. त्याच्या कुटुंबीयांनाहि हा फायदा थोड्या रकमेंत घेतां येतो. ही कंपनी रोगांच्या प्रतिबंधासाठी दरसाल २५ लक्ष डॉलर खर्च करते. विषुववृत्तावरील प्रदेशांतील युनायटेड फ्रूटच्या कामगारांस विमाकंपन्या उत्तर अमेरिकेंतील नागरिकांच्या मानानें जादा हप्ता आकारीत नाहींत, इतका हा उपक्रम यशस्वी झाला आहे. युनायटेड स्टेटस रबर कंपनीनें अतिपूर्वेकडील १,३१,००० एकरांच्या आपल्या मळ्यांतील ६०,००० 'नेटिव्ह' कामगारांच्या आरोग्याची व्यवस्था केली आहे. वरिष्ठ दर्जाच्या नोकरांची दरसाल वैद्यकीय तपासणी करवून घेण्याचा उपक्रम तर कित्येक कंपन्या करीत आहेत. "आमच्या यंत्राचे हे लोक म्हणजे महत्त्वाचे भाग; सेल्स मॅनेजर हा कांहीं विकत मिळूं शकत नाहीं." अशी त्यांची विचारसरणी आहे. फोर्ड मोटार कंपनी, जनरल मोटर्स, इत्यादि कंपन्या आपल्या वरिष्ठ नोकरांची विशेष काळजी घेतात व त्यांची प्रकृति दुरुस्त राखतात. अर्थात, मुख्यत: मोठ्या कंपन्यांतूनच कामगारांच्या आरोग्याची अशी काळजी वाहिली जाते; लहान (म्हणजे १,००० पेक्षां कमी कामगार असलेल्या) कारखान्यांतील ५०% पेक्षां कमी कामगारांना अशी सोय उपलब्ध आहे. कारखानदारांनीं आपल्या कामगारांच्या आरोग्यासाठी किती प्रयत्न करावा, ह्याला खर्चाची तर मर्यादा आहेच, परंतु त्याबरोबरच कामगारांना ह्या योजनांत मालकवर्गाचा विशेष मतलब आहे, असें वाटूं लागण्याचा संभव आहे. कांहीं झालें तरी प्रत्येक उद्योगधंद्यांतील विशिष्ट रोगांपासून कामगारांचा बचाव केला पाहिजे, हें निर्विवाद आहे. त्यासाठी शेकडो अमेरिकन प्रयोगशाळांतून प्रयोग चालू आहेत.

**हिमालयांतील वनस्पति**—हिमालयांत सांपडणाऱ्या कांहीं औषधी वनस्पतींकडे कांहीं अमेरिकन कंपन्यांचें लक्ष वेधलें आहे. संयुक्त-प्रांताच्या सरकारच्या औषधीय संस्थेकडे कांहीं प्रकारच्या वनस्पतींची मागणीही करण्यांत आली असल्याचें समजतें.

### स्वातंत्र्याचा तिसरा वाढदिवस

"आपल्या दृष्टीनें ऐतिहासिक महत्त्वाच्या ह्या दिवशीं, ज्यांनीं आपणांस स्वातंत्र्याप्रत नेलें त्यांना शोभेसे आपण होऊं असा निश्चय करूं या" ह्या पं. नेहरूंच्या उद्गारांची आठवण येथें करणें उचित होईल. स्वातंत्र्याचा उपयोग आपल्या आर्थिक, औद्योगिक, लष्करी व राजकीय सामर्थ्यांत वाढ होण्याकडे आपण करून घेतला पाहिजे. त्याविना मानवी उद्धारास वावच मिळणार नाहीं. राष्ट्रीय हितास विरोध करणाऱ्या सर्व घडामोडी आणि स्वार्थी प्रयत्न ह्यांस प्रमावी आळा बसला पाहिजे. वैयक्तिक प्रयत्नांतूनच सहकारी प्रयत्न निर्माण होतील ह्या दृष्टीनेंच नागरिकांनीं वागून आपलें स्वातंत्र्य प्रभावी करण्यास हातभार लावणें त्यांचें कर्तव्य ठरतें.

---

### पुणें सें. को. बँकेची वडगांव मावळ शाखा

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची नवीन शाखा वडगांव मावळ येथें १५ ऑगस्ट १९५० या स्वातंत्र्य दिनाचे शुभदिनीं सुरूं करण्यांत येत आहे. तरी मावळ भागांतील लोकांनीं व सोसायट्यांनीं याचा अवश्य फायदा घ्यावा अशी बँकेचे चेअरमन श्री. तुळशीबागवाले यांची विनंती आहे.

**कोरियांतील युद्ध आणि साखर**—कोरियांत चाललेल्या युद्धामुळें साखरेच्या जागतिक बाजाराची परिस्थिति बदलली आहे. जुलै महिन्यांत साखरेची किंमत दर १०० पौंडामागें १.६५ सेंट वाढली. त्यामुळें क्यूबांतील ७,५०,००० हजार टन साखर व्यापाऱ्यांनीं आयात केली. एक महिन्यापूर्वी क्यूबांत मागील हंगामांत तयार झालेली इतकी साखर शिल्लक होती कीं, पुढील हंगामाच्या उसाचें काय करावें असा प्रश्न पडला होता. आता मात्र कांहीं देशांच्या मामुली मागण्या पुरवल्या येतील कीं नाहीं अशी शंका आहे.


# १५ ऑगस्टनें
## देशास राजकीय स्वातंत्र्य दिलें
# वेस्टर्नचा विमा
## आपणांस आर्थिक स्वातंत्र्य देतो

आजच भेटा अगर लिहा

शाखा व ऑर्गनायझेशन कचेऱ्या :

मुंबई, सोलापूर, कोल्हापूर, बेळगांव, नाशिक, जळगांव, अहमदनगर, जालंदर, दिल्ली, कलकत्ता, मद्रास, नागपूर, अहमदाबाद, बडोदें, इंदूर, हुबळी, हैद्राबाद (दक्षिण)

पुणें शाखा : १७९ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
फोन नं. ३४०१

के. वाय. जोशी,
मॅनेजर, B. A., A. I. A.

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.
सातारा शहर.

## " वनस्पती " " बरी का वाईट ? "

### पण त्याच्या अगोदर चहाचा काढा बंद करा !

लेः–श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम्, पुणें–मुंबई

सध्यां वर्तमानपत्रांतून " वनस्पती " बद्दल मोठमोठ्या ठळक टाइपांत जाहिराती येत आहेत. त्याचप्रमाणें " मौजेंत " तीन लेख येऊन गेले. ' हरीजन " मध्यें श्री. किशोरलाल मश्रुवाला यांनीं " वनस्पती " विरुद्ध लेख लिहिला आहे, व त्याचा अनुवाद ' लोकशक्ति ' वगैरेंत प्रसिद्ध झाला आहे. आपलें " अर्थ " मध्येंहि आपण श्रीमंत दहाणूकर यांचे पुस्तिकेचा सारांश छापला आहे. याप्रमाणें सध्यां वर्तमानपत्रांतून वनस्पतीचे विरुद्ध व वनस्पतीचे बाजूनें लेख येऊन पुष्कळ चर्चा चालू आहे. दोन्ही आपापल्यापरीनें आपले मुद्दे जनतेच्या मनावर ठसतील अशा-रीतीनें मांडीत आहेत त्यामुळें जनतेचा थोडासा घोटाळा उडतो व त्यांत खरं कोण असा प्रश्नही विचारला जातो.

पहिल्या प्रथम एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. " सरकार " नें वनस्पति तयार करणाऱ्या कारखान्यांचेवर कांहीं बंधनें घातलीं आहेत व अमूक एक प्रतीचा माल काढावा असें ठरवून दिलें आहे. ज्याला इंग्रजींत मेल्टिंग पॉईंट म्हणतात–विलय बिंदू–त्या ठरविलेल्या विलय बिंदुप्रमाणें माल काढणें कारखानदारांवर बंधनकारक आहे. त्यामुळें वनस्पतीचा खाण्याकडे उपयोग केल्यास ती शरीरांत पचते. मागें, हें प्रमाण ठरविण्याचे अगोदर शरिरांत विलय होणार नाहीं अशी "वनस्पति" तयार होई व ती शरिरास अपायकारक असे. तसें आतां नाहीं. तो दोष काढून टाकण्यांत आला. त्याचप्रमाणें " वनस्पति " तयार करतांना उपयोगांत आणलेल्या तेलांच्या डब्यावर नामनिर्देश करावा लागतो. त्यामुळें " वनस्पति " वापरणारांना आपण काय वापरतों तें कळून येतें. " वनस्पति " विरुद्ध पुढें केलेल्या इतर मुद्यांना श्रीमंत दहाणूकर यांनीं उत्तरें दिलीं आहेत तीं वाचकांनीं पहावीं.

आपल्याला शरीरपोषणासाठीं कांहीं स्निग्ध पदार्थांची जरूर असते. स्वस्ताईचे काळीं दूधदुभतें भरपूर असे व त्यावेळीं लोणी व तूप हीं बहुतेक सर्वांच्या आटोक्यांत असत. लढाईंत लाखों दुभतीं जनावरें मारलीं गेलीं व त्यामुळें लोणी व तूप महागलें. येथें अर्थशास्त्र आलें. मागणीपेक्षां पुरवठा फार कमी, त्यामुळें किंमती वाढल्या व मध्यम वर्गाच्या तोंडचें लोणी-तूप काढलें गेलें व शिवाय जें मिळतें तें शुद्ध नाहीं, त्यांतही भेसळ आढळते. दुसरा स्निग्ध पदार्थ तेल. महाराष्ट्रांत व विशेषतः मध्यम वर्गांत तेलाचा उपयोग भाज्यांत व तळण्याकडे व पोळ्यांना मोहन घालण्याकडे होतो. तेलांत सांजे, शिरे, लाडू कोणी केल्यास ते खमंग व स्वादिस्ट लागणार नाहींत पण हें तेल, जर कांहीं रासायनिक क्रिया करून, खवट होणें, वास येणें वगैरे त्यांतील दोष काढून टाकले तर तें तुपाऐवजीं वापरण्यास अडचण पडत नाहीं व ही गोष्ट जनतेस पटल्यामुळें " वनस्पति, " म्हणजे " दोषरहित शुद्ध तेल " वापरण्याकडे मध्यम वर्ग वळला व आतां सर्रास वापरूं लागला.

वर्गवारी केल्यास पहिला नंबर, आहाराच्या उपयुक्ततेप्रमाणें, शुद्ध लोणी व तूप यांना, व दुसरा नंबर " शुद्ध ताजें तेल " व " वनस्पति " यांना. आर्थिक परिस्थितीमुळें व तेलाचा उपयोग कांहीं विशिष्ट पदार्थ तयार करण्याकडे करतां येतो म्हणून, पाहिजे तर गौण पक्ष म्हणून म्हणा, " वनस्पति " ही एक आवश्यक वस्तु झाली आहे. तीमधील शरिरास अपायकारक अशी घडण बदलल्यामुळें, सध्यांचे महागाईचे काळांत "वनस्पति" बंद करणें योग्य होणार नाहीं.

आतां कारखानदारांचा एक मुद्दा तपासूं. ते म्हणतात कीं, या "वनस्पती"च्या धंद्यांत कोट्यावधी रुपये गुंतले आहेत, सरकारला लाखों रुपये कर म्हणून मिळतात. हजारों लोक यावर पोट भरतात वगैरे. पण हा मुद्दा गौण आहे. जर खरोखर " वनस्पति " सध्यां तयार होते ती, शरिराला अपायकारक आहे असें सिद्ध होईल तर ती, दारूप्रमाणें, बंद करणें योग्य होईल. मग कितीही कोटी भांडवल गुंतलें असो गेल्या दोन वर्षांत प्रयोग करून, सध्यां शरिरांत पचूं शकेल अशी तयार करण्यांत येणारी "वनस्पति" शरिराला अपायकारक नाहीं असें मोठ मोठे शास्त्रज्ञ सांगत आहेत. तें खोटें ठरल्यासच वनस्पतिबंदीचा प्रश्न.

दुसरी बाजू सांगतें कीं "वनस्पती"चा परिणाम दूधदुभतें, वगैरेवर होतो व तिचा "भेसळी" कडे उपयोग होतो व त्यामुळें व्यापारांना दानत सोडण्याचा मोह होतो. यास उपाय, " वनस्पति "-बंद करणें हा नाहीं. "भेसळ" करणाऱ्यांना पुढें आणून त्यांना दणदणीत शिक्षा करणें हा होय. त्यासाठीं "वनस्पती"विरुद्ध असलेल्या पक्षानें " सरकार " ला जागें करावें, व सरकारी अधिकाऱ्यांना अधिक कार्यक्षम करावे, व " भेसळीचे गुन्हे " शोधून गुन्हेगारांना भीति वाटेल इतकी कठोर शिक्षा करवावी. दुसरें, दूधदुभतें वाढविण्याचा फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्न व्हावा व शुद्ध तूप, दूध व लोणी मिळण्याची खास सोय करावी. याला १५–२० वर्षें लागतील. एकदां शुद्ध तूप, लोणी आल्यावर वनस्पतीला पळून जावें लागेल व वनस्पतीचे कारखानदारांना परदेशच्या पेठा शोधाव्या लागतील !

सध्यां " प्लॅनिंग " सर्वांपुढें आहे. प्लॅनिंग कमिशननें " दूधदुभतें व वनस्पति" व यासाठीं एक खातें ठेवावें व त्या खात्याकडून खालील गोष्टी करवून घ्याव्यात.

१ दूधदुभतेची वाढ, व शुद्धता राखणें.

२ व त्याची खात्रीचे दुकानांतून वांटणी.

३ वनस्पतीची किती वाढ करावयाची व

४ ती कोठें कोठें हें एकदा नक्की करून वाटेल त्याला, जवळ पैसा आहे म्हणून कारखाना काढूं देऊं नयेत. टाटा, डालडा, अमृत वगैरेंचे अनुभव ध्यानांत घेऊन उत्तम तऱ्हेनें चालण्यास कमींत कमी उत्पादन ठरवून त्याचे खाली उत्पादन करणारे कारखाने काढूं न देणें. म्हणजे कारखानदारांना वाकडें जाण्याची जरूरी पडणार नाहीं. त्याचप्रमाणें मालाचें वांटप योग्य पद्धतीनें केल्यास " भेसळ " दारांना माल मिळणार नाहीं.

व ५ वनस्पतीची शाळा स्थापून संशोधन चालू ठेवणें व त्या शाळेंत ठिकठिकाणचा माल तपासणें व हलक्या दर्जाचा माल कोणी कारखानदारानें काढल्यास त्याचा परवाना रद्द करणें.:

आतां या चर्चेशीं संबंध नसलेला परंतु जनतेच्या आरोग्याचा प्रश्न याबाबत उद्भवल्यामुळें एका गोष्टीकडे या चर्चेत भाग घेणाऱ्यांचे व जनतेचें लक्ष वेधतों.

दूधसाखरेची टंचाई झाली आहे. व त्यामुळें " चहाचा काढा " मनुष्यानें पिण्यास अयोग्य व आरोग्यास बाधक असा सध्यां विकला जातो. वनस्पतीमुळें जर एक आणा अपाय होत असेल, तर, सध्यां आश्रमांतून, उपहारगृहांतून, चहापोईतून एक आण्यास अर्धा-पाऊण कप मिळणारा काढा शरीरास कसा पोखरतो आहे इकडे सरकार, आरोग्याची काळजी दाखविणारे जनतेचे हितकर्ते, डॉक्टर मंडळी, लक्ष देतील काय ? मोटार स्टॅन्डवर, रेल्वे स्टॉलवर व त्यालगत स्वतंत्र उपहारगृहें जनतेला काय पाजतात इकडे लक्ष जाईल का ? तें मिश्रण, काढा अथवा गोल्डन टी जवळ जवळ वीषच असतें. वनस्पतीचे अगोदर हा चहा बंद होणें जरूर आहे. उत्तम, शुद्ध, न उकळलेला चांगला चहा पाहिजे. परंतु सध्यांचा काढा बंद होणें जरूर आहे.

# भारतांत अन्नधान्यांची आयात

( एप्रिल ते मार्च बारमाहीचे आकडे )

| माल | १९४९–५० | | १९४८–४९ | | १९४७–४८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदी बंदरांतून | इतर बंदरांतून | हिंदी बंदरांतून | इतर बंदरांतून | हिंदी बंदरांतून | इतर बंदरांतून |
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| गहूं | ५९,८१,४०,२२६ | ५३,२३,६१८ | ५१,५९,४३,३६३ | ४,९५,७८,६८२ | २९,००,४४,०९५ | २,८८,६०,२८६ |
| तांदूळ | २५,७२,४२,५७५ | — | ५०,५६,५२,७३२ | ३,१७,७२,०१५ | २९,०२,८७,६४२ | १,१७,१६,३३३ |
| असडीक तांदूळ | ८,१२,८९,५७५ | — | — | — | ९,४२,२०० | — |
| मैदा | ४,२६,१९,१५० | — | ६,८३,६५,७२४ | — | १२,४४,६०,३१५ | — |
| बार्ली | २,०३,४०,८२४ | — | २,३७,८२,३०६ | २६,९६,५१७ | ६,६१,६८,८७४ | ३४,९१,३८४ |
| ज्वारी–बाजरी | ४५,१०,१७० | — | ९२,५८,१७६ | — | ६४,८९,००० | — |
| मका | २,०३,४०,८२४ | — | २,३८,७२,६४५ | ५९,५३,४२१ | ११,६५,९५,२६४ | ८८,९८,४३१ |
| मिलो | ५,६२,७७,५६१ | ७,५०,७२१ | ४,९५,३०,५५३ | १,८५,१५,६५३ | १२,७६,६४,११३ | १,४८,७५,१७९ |
| इतर | | | | | | |
| एकूण रु. | १०७,२८,५८,२१३ | ६०,७३,८८९ | १२०,१६,७५,०८२ | १०,८६,१६,२८८ | १०२,२६,५१,६२७ | ६,७८,४२,१९३ |
| सर्व आयात एकूण रु. | १०७,८९,३२,१०२ | | १३१,०२,९१,२७० | | १०९,०४,९३,८२० | |
| एकूण टन | २८,४३,१७२ | १७,४१६ | २७,६९,१२७ | २,८६,०८० | २४,७५,६११ | १,८४,४०४ |
| सर्व आयात एकूण टन | २८,६०,५८८ | | ३०,४६,२०७ | | २६,६०,०१५ | |


फोनः ३४५११ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–**

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः—**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलं, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.**

**शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

### विक्रीवरील कमिशनचा गिरण्यांवरील ताण

अहमदाबादमधील कापडाच्या ३५ गिरण्यांनीं मॅनेजिंग एजंटांना कापडाच्या विक्रीवरील कमिशन म्हणून १६६ लाख रुपये दिल्याचें त्यांच्या अहवालावरून दिसून येतें. मुंबईतील गिरण्या कमिशन विक्रीवर न देता नफ्यावर देतात. अहमदाबादमधील प्रत्येक कापडाच्या गिरणीला सरासरी ४,७०,००० रुपये कमिशन म्हणून द्यावें लागलें, असा ह्याचा अर्थ आहे. मुंबईतील गिरण्या नफ्यावर १० टक्के कमिशन मॅनेजिंग एजंटांना देतात. अर्थात ह्यांत घसारा वजा घातलेला नसतो. हीच पद्धत अहमदाबादमधील गिरण्यांच्या मॅनेजिंग एजंटांना लावावयाची म्हटल्यास अहमदाबादमधील प्रत्येक गिरणीच्या मॅनेजिंग एजंटांना ४,७०,००० रुपये इतकी रक्कम मिळण्यासाठी सरासरी ४७ लाख रुपये एकूण नफा व्हावयास पाहिजे. परंतु इतका नफा बहुतेक गिरण्यांना झालेला नाहीं. अहमदाबादमधील पांच प्रातिनिधिक गिरण्यांच्या संबंधीं पुढील कोष्टक दिलें आहे.

आकडे लाख रुपयांचे

| गिरणी नं. | एकूण नफा | मॅनेजिंग एजंटांचें कमिशन | एकूण नफ्यांतील टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ७·०४ | ३·७८ | ४३·५ |
| २ | ३३·१५ | १२·०५ | ३६·३ |
| ३ | ११·२८ | ३·३९ | ३०.० |
| ४ | १९·९२ | ५·८० | २९·१ |
| ५ | ५८·७३ | १५·८९ | २७·१ |

५ नंबरच्या गिरणीच्या मॅनेजिंग एजंटांनीं आपल्या कमिशनपैकी कांहीं भाग सोडून दिला आहे. तो सोडून दिला नसता तर टक्केवारीचें प्रमाण २७·१ न पडता ३२ पडलें असतें. गिरणी नं. २ चे मॅनेजिंग एजंट हे स्वतःच विक्री एजंट म्हणून काम करतात. ह्या कामासाठी ते विक्रीवर १॥ ते २ टक्के कमिशन घेतात. मॅनेजिंग एजंट म्हणून विक्रीवर मिळणारें ५ टक्के कमिशन वेगळेंच. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली तर टक्केवारीचें प्रमाण ३६·३ न पडतां ४५ टक्क्यांपेक्षांही अधिक पडेल.

अहमदाबादचे मॅनेजिंग एजंट उत्पादन खर्चांत कपात करण्यासाठी मजुरींत कपात करण्यांत यावी असा प्रयत्न करूं लागले कीं, मजूर संघटनांकडून साहजिकच विरोध होतो. मजूर संघटनांचें म्हणणें असें असतें कीं मजुरी कमी करीत असाल तर त्याचबरोबर कापडाच्या विक्रीवरील कमिशनमध्येंही तशीच कपात करण्यांत आली पाहिजे. अहमदाबादमधील कांहीं मॅनेजिंग एजंटस् मुंबईमधील गिरण्यांचेही मॅनेजिंग एजंटस् आहेत. अहमदाबादमधील कांहीं गिरण्यांनीं स्टार्च व रसायनाचे उद्योगधंदे काढले आहेत. ह्या नवीन धंद्यांत नफ्यावर कमिशन घेण्याची प्रथा त्यांनींच पाडली आहे. ह्या माहितीवरून असें दिसून येईल कीं, विक्रीवर कमिशन घेण्याची पद्धत आतां रूढ झाली आहे. ह्या पद्धतीमुळें भागीदारांचें नुकसान होत आहे.

**इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाची बैठक**—इंटर नॅशनल मॅनेटरी फंड आणि इंटर नॅशनल बँक ह्या दोन जागतिक संस्थांनीं आपली पुढील बैठक सप्टेंबर १९५१ मध्यें दिल्लींत भरवावी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. ह्या संस्थांच्या बैठकांसाठीं ६१५ प्रणांची रहाण्याची सोय करावी लागेल आणि टेलिफोन असलेल्या सुमारें १०० खोल्या तरी लागतील. भारतीय सरकारचे खाणी व वीज खातें इतकी सोय करूं शकत नाहीं, त्यामुळें अडचण निर्माण झाली आहे.

### उसनवार घेतलेल्या चांदीची फेड

युद्धाच्या काळांत भारतानें अमेरिकेकडून उसनवार चांदी घेतली होती. चांदीप्रमाणें इतरही बराच माल अमेरिकेकडून घेतला होता. त्यासंबंधीं देणें युद्धाच्या अखेर पूर्णही झालें. चांदीची फेड मात्र चांदीच परत देऊन करावयाची आहे. परत फेडीची मुदत युद्ध संपल्यानंतर ५ वर्षांच्या आंत ही ठरलेली आहे. तथापि अजून ही तारीख निश्चितपणें ठरविण्यांत आलेली नाहीं. अमेरिकेला इंग्लंडकडूनही ८,८१,००,००० औंस चांदी येणें आहे. भारताच्या पूर्वींच्या रुपयांत ५० टक्के चांदी आणि ५० टक्के इतर धातूचें मिश्रण असे. हे रुपये आतां वितळविण्यांत यावयाचे असून त्यांच्यापासून ३०,००,००,००० शुद्ध औंस चांदी निघेल असा अंदाज आहे. ही बहुतेक सर्व चांदी अमेरिकेला पाठविण्यांत येणार आहे. ५० टक्के चांदी असलेले रुपये व्यवहारांतून काढून घेऊन त्यांची जागा निकेल मिश्रित रुपये घेत आहेत. चांदीचे रुपये गाळण्यासाठीं एक टांकसाळ काढण्यांत येत असून तिच्या उभारणीचें काम एका ब्रिटिश एंजिनिअरिंग कंपनीकडे देण्यांत आलें आहे. रुपये वितळविण्याचें काम बरेंच अवघड आणि तांत्रिक स्वरूपाचें आहे. ब्रिटनमधील रॉथस्चाइल्डस् रिफायनरीनें हें काम अंगावर घेतलें आहे.

**सहकारी संस्थेचें धरण**—कोल्हापूर जवळील सांगरूळ ह्या गांवीं सहकारी संस्था एक धरण बांधणार आहे. हें धरण कुंभी नदीवर बांधण्यांत येणार असून त्यासाठीं सांगरूळ धरण सहकारी सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेनें आतांपर्यंत ५९,३२० रुपयांचें भांडवल भागांची विक्री करून जमविलें आहे.


## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

( स्थापना २०–८–१९०७ )

## नोटीस

दि बँकिंग कंपनीज् ॲक्ट १९४९, मधील कलम ७ प्रमाणें दि सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी लिमिटेड या कंपनीचें नांव दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., असें बदलण्यांत आलें असून त्याप्रमाणें नांवांतील फरकाबाबत रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्, मुंबई यांचें सर्टिफिकेट मिळालें आहे. तरी स्वदेशी कंपनीशीं संबंधित असणारांनीं व हितचिन्तकांनीं याची नोंद घ्यावी ही विनंति.

| | |
|---|---|
| विक्री झालेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | १,३५,६७० |
| राखीव निधि | १,०३,६६२–८–० |
| एकूण खेळतें भांडवल | सुमारें ५०,००,००० |

**मुख्य कचेरी :**

**भवानी पेठ, सातारा शहर**

शाखा—

कराड, ओगलेवाडी, मसूर

*बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.*

सातारा — शं. ह. साठे

तारीख ३–८–५० — चेअरमन

## मिठाची कृत्रिम टंचाई टाळण्यासाठी सूचना

राजपुतान्यांतील सांबर सरोवरापासून मीठ तयार करण्यांत येतें. तेथील सॉल्ट मर्चंटस् असोसिएशननें मिठाच्या वांटपाबद्दल भारत सरकारच्या पुरवठा खात्याकडे एक खलिता सादर केला आहे. खलित्यांतील माहितीप्रमाणें भारतांतील मिठाच्या उत्पादनापैकीं २५ टक्के मीठ सरकारी उत्पादन केंद्रांतून तयार होतें. सांबर सरोवर, पाचबद्रा, दिडवाना आणि खाराघोडा. येथील उत्पादन–केंद्रांतून दरवर्षी सुमारें दोन कोटी मण मीठ तयार होतें. त्यांतील १·१८ कोटी मण मीठ खुल्या व्यापाराकरता देण्यांत यावें असें सॉल्ट ॲडव्हायजरी कमिटीनें सुचविलें आहे. कमिटीनें सुचविल्याप्रमाणें मीठ देण्याचें ठरविल्यास त्याची वहातूक करण्यासाठीं दरमहा २,७०० वाघिणी लागतील. वर निर्दिष्ट केलेल्या चार उत्पादन–केंद्रांत मिठाचा व्यापार करणारे ६७८ घाऊक व्यापारी होते. ही संख्या एप्रिल १९५० अखेरची आहे. ह्याशिवाय स्थानिक व्यापारी निराळेच आहेत. मिठावरील नियंत्रण उठविण्यांत आल्यामुळें आतां अधिक घाऊक व्यापारी ह्या धंद्यांत पडण्याचा संभव आहे. व्यापाऱ्यांपासून पैसे घेण्यासाठीं सुमारें १०० पोस्ट ऑफिसें आणि सरकारी तिजोऱ्या मुक्रर करण्यांत आल्या आहेत.

मिठाच्या व्यापारांत मक्तेदारी सुरू होण्याचा संभव असल्यानें कोणाही एका व्यापाऱ्याला अगर कंपनीला ५ रेल्वे वाघिणींपेक्षां अधिक मीठ देण्यांत येऊं नये अशी सूचना संघानें केली आहे. पांच वाघिणी मिठाची विल्हेवाट लावण्यांत आल्यावर त्यांना आणखी मीठ घेण्याची परवानगी असावी. मिठासाठी मागणी नोंदणारी कंपनी रजिस्टर्ड असावी. खरेदी करणाऱ्या व्यक्तींनीं आपलें नांव आपल्या वडिलांच्या नांवासह द्यावें म्हणजे खोट्या नांवाखालीं अधिक मीठ खरेदी केलें जाणार नाहीं. घेतलेलें मीठ ठरलेल्या ठिकाणाऐवजीं इतर ठिकाणीं पाठविण्याचें झाल्यास नवीन ठिकाण त्या जिल्ह्यांतीलच असावें. प्रत्येक व्यापाऱ्यानें आपल्याला जवळ असलेल्या सरकारी तिजोरींतच मागण्या नोंदवल्या म्हणजे निरनिराळ्या ठिकाणांहून एकाच व्यापाऱ्याला अधिक मागण्या नोंदता येणार नाहींत.

सांबर येथील सॉल्ट मर्चंटस् असोसिएशननें वरील सूचना मिठाची नाकेबंदी करून कृत्रिम टंचाई निर्माण करतां येऊं नये म्हणून केल्या आहेत.

**भारतांत अमेरिकेचे नांगर**—पूर्वेकडील देशांना मदत देण्यासाठी अमेरिकेंत 'केअर' नांवाची एक संघटना उभारण्यांत आली आहे. ह्या संस्थेचा उद्देश नफा मिळवणें हा नसून संस्था पूर्ण खाजगी स्वरूपाची आहे. संस्थेकडून गरजूंना अन्न, कपडे इत्यादी जरूरीच्या वस्तू पुरविण्यांत येतात. पाकिस्तान व हिंदुस्थान ह्या देशांतील छोट्या शेतकऱ्यांना १५ पौंड वजनाचा एक नांगर पाठविण्यास संस्थेनें सुरवात केली आहे. हा नांगर सुटा करून पुन्हां जोडतां येतो. त्याचा उपयोग मुख्यत: हातानें करावयाचा असला तरी बैलाकडून ओढण्याची व्यवस्था केलेली आहे. नांगराबरोबरच तो ओढण्याचें सचित्र पुस्तकहि देण्यांत येतें.

**जागतिक बँकेचें उत्पन्न**—जून १९५० अखेर संपलेल्या फंडाणिशी वर्षांत इंटर नॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन ॲंड डेव्हलपमेंट ह्या संस्थेला १,३६,९८,३९८ डॉलर्स निव्वळ उत्पन्न झालें.


# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,१३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर    भ. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाउस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ३०,९१,००० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. ३०,९७,८०० |
| ठेवी | रु. ७,२२,४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ९,२०,५०,००० |

## १३ जिल्ह्यांत ५७ शाखा

हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. त्यांच्या शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.